**ठळक बातम्या**

- युवा शक्तीला केंद्रस्थानी ठेवून तयार केलेला ३ कर्तव्यांवर भर देणारा अर्थसंकल्प निर्मला सीतारामन यांच्याकडून लोकसभेत सादर

- टियर २ आणि टियर ३ शहरांवर भर दिला जाणार, प्रत्येक जिल्ह्यात मुलींसाठी वसतीगृहांची स्थापना

- कृषी, MSME, पर्यटन क्षेत्रासाठी विविध घोषणा, १ एप्रिलपासून नवीन आयकर कायदा लागू होणार, आयकर परताव्याचे अर्ज सुलभ होणार

**आणि**

- शेअर बाजारातल्या गुंतवणुकीवर अतिरीक्त करांच्या प्रस्तावामुळे शेअर बाजारात मोठी घसरण

**<><><><><>**

देशातल्या युवा शक्तीला केंद्रस्थानी ठेवून तयार केलेला अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत सादर केला. त्यात आर्थिकवृद्धीदर वाढवणे, नागरिकांचं कौशल्य विकसित करणे आणि सर्व नागरिकांना सोयीसुविधा, सवलतींचा पुरेपूर लाभ दिला जाईल, या ३ कर्तव्यांवर आधारित हा अर्थसंकल्प असल्याचं त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

यंदाच्या अर्थसंकल्पात सिटी इकॉनॉमिक रिजन अर्थात शहरी आर्थिक क्षेत्रांचा विकास करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी आज केली. त्यासाठी प्रत्येक क्षेत्राला ५ वर्षात ५ हजार कोटी रुपयांचा निधी दिला जाणार आहे. याशिवाय दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतली शहरं, मंदिर असलेल्या शहरांवर लक्ष केंद्रीत करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. यासंदर्भातल्या इतर घोषणा जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून

**होल्ड व्हिसी**

*(देशातल्या महत्त्वाच्या औद्योगिक कॉरिडॉर्सच्या जवळ ५ शैक्षणिक परिसर विकसित करायची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. विविध विद्यापीठं, महाविद्यालयं, संशोधन संस्था, कौशल्य केंद्रांची संकुलं इथं सुरू होतील, असं त्यांनी सांगितलं. स्टेम, अर्थात विज्ञान, तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स आणि गणित या क्षेत्रांमध्ये विद्यार्थिनींना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक महिला वसतीगृह स्थापन करणार असल्याचंही अर्थमंत्र्यांनी जाहीर केलं.*

*मुंबईतल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीजच्या माध्यमातून १५ हजार माध्यमिक शाळा आणि ५०० महाविद्यालयांमध्ये एव्हीजीसी कंटेंट क्रिएटर लॅब्स सुरू करणार असल्याचं सीतारमण यांनी सांगितलं. सेवा क्षेत्राच्या विकासासाठी शिफारशी करण्याकरता शिक्षण ते रोजगार आणि उद्योजकता यावर एक उच्चाधिकार समिती स्थापन केली जाईल.*

*ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य सुविधा पुरवणाऱ्यांना योग, तसंच वैद्यकीय उपकरणं वापरण्याचं प्रशिक्षण देऊन येत्या काळात अशा दीड लाख काळजीवाहकांना प्रशिक्षित करायचं ध्येय असल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं. आयुर्वेदाला चालना देण्यासाठी ३ नव्या अखिल भारतीय आयुर्वेद संस्थांची स्थापना केली जाणार आहे. पशुवैद्यकीय क्षेत्रात उत्तम मानवी संसाधनं विकसित करण्यासाठी खासगी क्षेत्रात पशुवैद्यकीय आणि निमपशुवैद्यकीय महाविद्यालयं, रुग्णालयं, निदान प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी कर्ज आधारित भांडवली अनुदान सहाय्य योजना सुरू करणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं.*

*सध्याच्या नॅशनल काऊन्सिल फॉर हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नोलॉजी चा दर्जा वाढवून नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉस्पिटालिटीची स्थापना करण्याचा प्रस्ताव आहे. निवडक २० पर्यटनस्थळांवर १० हजार गाईड्स करता प्रशिक्षण अभ्यासक्रम, वाघ आणि इतर वन्यजीव प्रजातींचं संरक्षण संवर्धन, पुरातत्व सर्वेक्षणाची १५ स्थळं पर्यटकांसाठी खुली करणं, पुरातत्व विद्या अध्ययनासाठी आधुनिक तंत्रज्ञान, प्रयोगशाळा आणि मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध केली जाईल. )*

**<><><><><>**

येत्या नवीन आर्थिक वर्षापासून देशात नवीन प्राप्तिकर कायदा लागू होणार आहे. त्यात प्राप्तिकराचे नियम आणि परताव्याचे अर्ज सुलभ केले असून लवकरच ते उपलब्ध होतील. सर्वसामान्य नागरिकांना सुलभरित्या भरता येतील अशा रितीने हे अर्ज तयार केल्याची माहिती निर्मला सीतारामन यांनी दिली. करासंबंधीच्या विविध घोषणा जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.५० वाजता
१ फेब्रुवारी २०२५ - रविवार

## होल्ड व्हाइस कास्ट

*(आयटीआर १ आणि आयटीआर २ हे अर्ज भरणाऱ्यांना ३१ जुलै पर्यंतच हे अर्ज भरावे लागतील. इतरांना मात्र ३१ ऑगस्टपर्यंत मुदत वाढवून मिळणार आहे. सुधारित आयकर विवरण पत्र आता नाममात्र शुल्क भरुन ३१ डिसेंबर ऐवजी ३१ मार्चपर्यंत भरता येईल. शेअर बाजारात गुंतवणूक असणाऱ्यांना आता डिपॉझिटरीकडे एकदाच १५ जी किंवा १५ एच अर्ज भरता येणार. हाच अर्ज गुंतवणूक केलेल्या सर्व कंपन्यांना पुरवला जाईल. याशिवाय टीसीएस, टीडीएस यातही काही सुधारणांची घोषणा आजच्या अर्थसंकल्पात झाली. तसंच करचोरीच्या काही प्रकरणांमध्ये दंड भरुन नागरिकांना मुक्त होता येणार आहे. सहकारी संस्था, माहिती तंत्रज्ञान कंपन्या, डेटा सेंटर स्थापन करणाऱ्या कंपन्यांना आयकरात सवलत जाहीर झाली आहे.*

*देशातल्या बँकिंग क्षेत्राचा आढावा घेण्यासाठी आणि विकसित भारताच्या दृष्टीने त्यांना सक्षम करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची घोषणा अर्थमंत्र्यांनी आज केली. याशिवाय PFC आणि REC या सरकारी बिगर बँकिंग वित्तीय संस्थांची पुनर्रचना केली जाणार आहे. परकीय चलन व्यवस्थापनांच्या नियमांचा आढावा घेण्याची घोषणाही त्यांनी केली. रोखे बाजारात सुधारणा, १ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचे रोखे आणणाऱ्या महापालिकांना १०० कोटी रुपयांचा निधीही केंद्र सरकार देणार आहे.*

*शेअर बाजारातल्या फ्युचर आणि ऑप्शनमध्ये व्यवहार करणाऱ्यांना आता पूर्वीपेक्षा अधिक दरानं कर द्यावा लागेल. फ्युचरसाठी हा कर २ शतांश टक्क्यावरुन ५ शतांश टक्के झाला आहे. तर ऑप्शनसाठी हा कर सध्या १ दशांश टक्क्यांवरुन १५ शतांश टक्के होणार आहे. सर्वप्रकारची समभाग पुनर्खरेदीतून मिळणारा नफा आता कॅपिटल गेन म्हणून गृहित धरला जाणार आहे.*

*मत्स्य निर्यात, चामडे आणि वस्त्रोद्योगाला निर्यातीसाठी विविध प्रकारच्या करसवलती अर्थमंत्र्यांनी आज जाहीर केल्या. या उद्योगांसाठी लागणाऱ्या काही वस्तूंच्या आयातीवरही कुठलाही कर लागणार नाही, असंही त्यांनी आज जाहीर केलं. अणूऊर्जा प्रकल्पांचे साहित्य, लिथियम आयन बॅटरी, सौर उपकरणांच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या वस्तू, दुर्मिळ खनिजं,  विमान निर्मितीसाठीचे सुटे भाग, आयातीवरच्या शुल्कातही आज सवलत जाहीर झाली. मायक्रोवेव्ह ओव्हनसाठी लागणाऱ्या काही वस्तू मूलभूत उत्पादन शुल्क मुक्त झाल्यानं स्वस्त होणार आहेत. व्यक्तीगत वापरासाठी आयात केलेल्या वस्तूंवर आता २० ऐवजी १० टक्के आयात शुल्क लागेल. त्याचवेळी कर्करोगाच्या १७ औषधांना सीमा शुल्कातून सवलत मिळाली आहे. सीमा शुल्कासंबंधीच्या विविध प्रक्रिया तसंच कार्गो हाताळणीची प्रक्रिया सुलभ करण्याची घोषणाही अर्थमंत्र्यांनी आज केली. )*

**<><><><><>**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना मदत करण्याच्या उद्देशानं सरकार दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतील शहरांमध्ये कॉर्पोरेट मित्र ही व्यवस्था उभारणार असल्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केली. कॉर्पोरेट मित्र या व्यवस्थेअंतर्गत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना नियमांचे पालन करण्याची प्रक्रिया परवडणाऱ्या दरात पूर्ण करण्यासाठी मदत पुरवली जाईल असं त्या म्हणाल्या. कॉर्पोरेट मित्र ही व्यवस्था उभारण्यासाठी अल्पमुदतीचे अभ्यासक्रम आणि प्रात्यक्षिक साधनं तयार करण्यासाठी सरकार आयसीएआय, आयसीएसआय आणि आयसीएमएआय यांसारख्या व्यावसायिक संस्थांना सहकार्य करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांना चॅम्पियन म्हणून विकसित करण्यासाठी दहा हजार कोटी रुपयांच्या विकास निधीची घोषणा त्यांनी केली. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना आधार देण्यासाठी येत्या आर्थिक वर्षात

आत्मनिर्भर भारत निधीत चार हजार कोटी रुपये अतिरिक्त तरतुदीची घोषणा त्यांनी केली, तसंच जोखीम भांडवल पुरवण्यासाठी याच निधीमध्ये दोन हजार कोटी रुपयांची आणखी भर घातली जाईल असं त्यांनी सांगितलं.

कृषी क्षेत्राअंतर्गत उत्पादन वाढीसाठी नारळ प्रोत्साहन योजनेसोबतच चंदन आणि अक्रोड यांसारख्या उच्च मूल्य असलेल्या पिकांसाठी मदत पुरवली जाण्याची घोषणा त्यांनी केली. चंदनाच्या परिसंस्थेचं वैभव पुन्हा प्राप्त करण्यासाठी केंद्र सरकार राज्यांसोबत भागीदारीअंतर्गत काम करेल असं त्यांनी सांगितलं. पशुधन शेतकरी उत्पादक संघटनांना प्रोत्साहन देण्यासाठी पत संलग्न अनुदान कार्यक्रमाचा प्रस्ताव त्यांनी मांडला.

पुढच्या पाच वर्षांत बायोफार्मा शक्ती कार्यक्रमासाठी दहा हजार कोटी रुपयांची तरतूद आणि पाच प्रादेशिक वैद्यकीय केंद्रं स्थापन करण्यासाठी राज्यांना मदत करण्यासाठी योजना सुरू केली जाईल अशी घोषणा त्यांनी केली.

<><><><><>

महिलांना अर्थसहाय्य पुरवण्यासाठी समूहाच्या मालकीच्या स्वसहाय्यता स्वयंउद्योगकता अर्थात **शी मार्ट्सची** स्थापना करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली.

खादी, हातमाग आणि हस्तकला क्षेत्राला बळकटी देण्यासाठी, त्यांना जागतिक बाजारपेठेशी जोडण्यासाठी आणि ब्रँडिंगसाठी महात्मा गांधी ग्राम स्वराज उपक्रम राबवला जाईल असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

देशभरात दळणवळण सुविधा मजबूत करण्याच्या उद्देशानं विविध महानगरं जोडणाऱ्या रेल्वेच्या ७ हायस्पीड कॉरिडॉर्सची घोषणा आज केंद्रीय अर्थमंत्र्यांनी

अर्थसंकल्पीय भाषणात केली. मुंबई - पुणे, पुणे -हैद्राबाद, हैद्राबाद - बंगळुरू, हैद्राबाद - चेन्नई आणि चेन्नई - बंगळुरू तसंच दिल्ली- वाराणसी आणि वाराणसी - सिलिगुडी या मार्गांचा त्यात समावेश आहे.

<><><><><>

अर्थसंकल्पानंतर देशातल्या शेअर बाजारात मोठी घसरण दिसून आली. सध्या सेन्सेक्स ९०० हून अधिक अंकांनी घसरुन ८१ हजार ३०० अंकाच्या आसपास व्यवहार करतो आहे. तर निफ्टी ३०० हून अधिक अंकांनी घसरल्यानं या निर्देशांकात २५ हजारांच्या आसपास व्यवहार सुरू आहेत.

<><><><><>

२०२६- २७ या आर्थिक वर्षासाठी साडेत्रेपन्न लाख कोटींचा केंद्रीय अर्थसंकल्प आज अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत सादर केला. या वर्षात सरकारला साडे छत्तीस लाख कोटी रुपये एकूण महसूल मिळेल, त्यातले २८ लाख ७० हजार कोटी रुपये करवसुलीतून मिळतील. २०२६-२७ या आर्थिक वर्षात वित्तीय तूट चालू वर्षीच्या ४ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांपेक्षा कमी म्हणजे ४ पूर्णांक ३ दशांश टक्के राहील असा अंदाज अर्थसंकल्पात व्यक्त केला आहे.

करमहसुलातला १ लाख ४० हजार कोटी रुपयांचा वाटा राज्यांना देण्यात येईल, त्यात विविध अनुदानांचा समावेश असेल असं अर्थमंत्री सीतारामन म्हणाल्या.

आगामी आर्थिक वर्षात कर्ज आणि जीडीपी चं गुणोत्तर ५५ पूर्णांक ६ दशांश टक्के राहील.

चालू आर्थिक वर्षासाठीचा करसंकलनाचा सुधारित अंदाज ३४ लाख कोटी तर व्ययाचा सुधारित अंदाज ४९ लाख ६० हजार कोटी रुपये असा व्यक्त केला आहे.

संरक्षण विभागासाठी यंदा ५ लाख कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

//<><><><><>//